(१५४)

(A21)

(P39)

खाजगी आरा गिरण्यांनी
ठेवावयाच्या नोंदवह्या.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र. एसडब्ल्यूएम १०८२/प्रक्र. २०/फ-६,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : ८ नोव्हेंबर, १९८९.

वाचा :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एसडब्ल्यूएम १०८२/
सीआर-२०/फ-६, दिनांक २२-२-१९८४.

<u>परिपत्रक</u> :-

खाजगी आरा गिरण्यांनी नमुना क्र. १ [अंतर्गामी नोंदवही], नमुना क्र. २ [उत्पादन नोंदवही] व नमुना क्र. ३ [केलेल्या कामाचा उरक दर्शविणारी नोंदवही] अशा ३ प्रपत्रात नोंदवह्या ठेवण्याबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. एसडब्ल्यूएम १०८२/सीआर-२०/फ-६, दिनांक २२-२-१९८४ अन्वये आदेश निर्गमित केले होते. शासनाच्या सदर आदेशास रत्नागिरी जिल्हा सॉ मिल आणि लाकूड व्यापारी संघ, यांनी रिट पिटीशन क्र. ५२०८/८५ द्वारे तर महाराष्ट्र टिंबर लघु उद्योग महासंघ, पुणे यांनी रिट पिटीशन क्र. ६०३१/८८ द्वारे, तसेच नाशिक टिंबर मर्चंट असोसिएशन, नाशिक, यांनी रिट पिटीशन क्र. ५११६/८८ द्वारे उच्च न्यायालयात आव्हान दिलेले होते. उच्च न्यायालयाने हे तिन्ही रिट पिटीशन एकत्रितपणे विचारात घेऊन त्यांच्या दिनांक ९-२-१९८९ च्या निर्णयान्वये फेटाळून लावलेले आहेत. उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाची एक प्रत आपणाकडे शासनाच्या दिनांक २६-९-१९८९ च्या पृष्ठांकनान्वये ग्लाहिती पाठविण्यात आलेली आहे. उच्च न्यायालयाने प्रस्तुतच्या निर्णयात केलेल्या मतप्रदर्शनाकडे आपले लक्ष वेधण्यात येते. शासन सर्व विभागीय वन अधिकाऱ्यांना आता असे आदेश देत आहे की, त्यांनी त्यांच्या परिक्षेत्रातील सर्व आरा गिरण्यांची नियमितपणे तपासणी करावी व खाजगी आरा गिरणी धारक शासनाच्या वरील दिनांक २२-२-१९८४ च्या निर्णयानुसार नमुना क्र. १, २ व ३ प्रमाणे नोंदवह्या ठेवतात किंवा कसे याची तपासणी करावी व कसूर करणाऱ्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(सही)

( सि. वि. गोडबोले )
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
प्रधान [illegible] महाराष्ट्र राज्य, नागपूर. पृ. मा. प.

837

26 FEB 1990

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
वनसंरक्षक, ठाणे, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर, नागपूर,
उत्तर चंद्रपूर, दक्षिण चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ,
औरंगाबाद वृत्त,
विभागीय वन अधिकारी, दक्षता विभाग, ठाणे, नाशिक, धुळे
उत्तर चंद्रपूर, दक्षिण चंद्रपूर, नागपूर, अमरावती, यवतमाळ,
सर्व प्रादेशिक विभागीय वन अधिकारी,
सर्व उप विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र प्रादेशिक विभाग),
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा/अनुज्ञेयता), नागपूर (प्रत्येकी २ प्रती),
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), नागपूर (२ प्रती),
वित्त विभाग/व्यय-१०,
फ-६ कार्यासन, महसूल व वन विभाग. (निवड नस्ती).